**प्रसिध्दी पत्रक**

**आलोसे १) विपीन चंद्रकांत सोळुंकी, वय २७ वर्षे, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक -१, पदमपुरा, औरंगाबाद. २) संजय अंबादास भोलाने, वय ४९ वर्षे, वरिष्ठ लिपीक, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, औरंगाबाद यांनी अनुक्रमे २०,०००/- रु व ३०००/- रु लाच स्विकारल्या नंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | १) विपीन चंद्रकांत सोळुंकी, वय २७ वर्षे, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक -१, पदमपुरा, औरंगाबाद. रा उर्जानगर, बीडबायपास, औरंगाबाद<br>२) संजय अंबादास भोलाने, वय ४९ वर्षे, वरिष्ठ लिपीक, प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, औरंगाबाद. रा. विकासनगर, उस्मानपुरा, औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे वेदांतनगर, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपासी अधिकारी | :- | श्री. गणेश धोक्रट, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | १) आलोसे क्रमांक १) यांनी २००००/- रु लाचेची मागणी करुन स्विकारले<br>२) आलोसे क्रमांक २) यांनी ३०००/- रु लाचेची मागणी करुन स्विकारले |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे मावस बहिणीचे प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, औरंगाबाद या कार्यालयास भाडेतत्वावर दिलेल्या इमारतीचे मुल्यांकन करून प्रमाणपत्र देण्यासाठी आलोसे क्रमांक १ यांनी लाच मागणी केली तसेच सदर इमारतीचे १४ महिन्याचे थकीत बील काढण्याची कारवाई करण्यासाठी मदत करण्यासाठी म्हणून आलोसे क्रमांक २ यांनी लाचमागणी केली. |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील तक्रारदार यांचे मावस बहिणीची इमारत ही प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, औरंगाबाद या कार्यालयास भाडेतत्वावर दिलेली आहे. सदर इमारतीचे नव्याने मुल्यांकन करून प्रमाणपत्र देण्यासाठी व सदर इमारतीचे १४ महिन्याचे थकीत बील काढण्याची कारवाई करण्यासाठी लोकसेवक लाचेची मागणी करित असल्याबाबत तक्रारदार यांनी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने १) विपीन सोळुंकी, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक -१, पदमपुरा, औरंगाबाद यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे २०,०००/- रुपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. तसेच आलोसे २) संजय भोलाने, वरिष्ठ लिपीक, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, औरंगाबाद यांनी ३०००/- रु लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दिनांक २३/०३/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, आलोसे क्रमांक १ विपीन सोळुंकी, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक -१, पदमपुरा, औरंगाबाद यांनी तक्रारदार यांचे मावस बहिणीचे इमारतीचे नव्याने मुल्यांकन करून प्रमाणपत्र देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडुन २०,०००/- रुपये लाचेची रक्कम त्यांचे कार्यालयात स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यानंतर आलोसे क्रमांक २ संजय भोलाने, वरिष्ठ लिपीक, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, औरंगाबाद यांचेविरुद्ध सापळा लावण्यात आला असता आलोसे भोलाने यांनी तक्रारदार यांचे मावस बहिणीचे ईमारतीचे १४ महिन्याचे थकीत बील काढण्याची कारवाई करून देण्यासाठी मदत म्हणून यांच्याकडुन ३,०००/- रुपये लाचेची रक्कम संत एकनाथ रंगमंदीर समोरील, मेडिकल स्टोअरच्या समोर, औरंगाबाद येथे स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

दोन्ही आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे वेदांतनगर, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद चे पोलीस अधिक्षक मा. श्री. अरविंद चावरीया, अपर पोलीस अधिक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. गणेश धोक्रट यांनी केली आहे. त्यांना पोना विजय बाम्हंदे, पोशि सुनिल पाटील, केदार कंदे, विलास चव्हाण, चालक बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID :-**1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, अॅन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

**(बी.व्ही.गावडे)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**औरंगाबाद,**

Scanned with CamScanner